कोकणसाद रविवार, दि. २२ जानेवारी २०२३

# 'ध्वज बांधणी व त्याची आचारसंहिता' कार्यशाळा दोडामार्ग येथे संपन्न

कोकणसाद वृत्तसेवा

**दोडामार्ग** : लक्ष्मीबाई सीताराम हळबे कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, दोडामार्ग येथे प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून मंगळवारी दि. १७ जानेवारी रोजी 'ध्वज बांधणी व त्याची आचारसंहिता' ही कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक यांचा महत्वाचा प्रतिसाद लाभला. या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक व वक्ते म्हणून विजयकुमार साळुंखे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत उपस्थित होते.



'ध्वज बांधणी व त्याची आचारसंहिता' कार्यशाळेत माहिती देताना प्रमुख मार्गदर्शक विजयकुमार साळुंखे. सोबत इतर मान्यवर.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून ल. सी. हळबे महाविद्यालयात देश भक्तीची जाणीव सर्वांच्या अंगी जोपासण्यासाठी एक आगळा-वेगळा उपक्रम आयोजित करण्यात आला. देशभक्ती साध्य करायची असेल तर ध्वज बांधणी हे प्रत्येकाला येणे आवश्यकच आहे आणि हाच उद्देश समोर ठेऊन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांच्या संकल्पनेतून 'ध्वज बांधणी व त्याची आचारसंहिता' ही कार्यशाळा एन.सी.सी. विभाग मार्फत आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक व वक्ते विजयकुमार साळुंखे, शिक्षक, माध्यमिक विद्यालय झरेबांबर हे उपस्थित होते. राष्ट्रध्वज बांधणी व ध्वज फडकविण्याबाबतची संपूर्ण तयारी तसेच पाळण्यात येणारी आवश्यक ती आचारसंहिता याबाबत विजयकुमार साळुंखे यांनी प्रात्यक्षिक दाखवीत उपस्थितांना माहिती दिली. यावेळी ध्वज बांधणी बाबतची अनेकांच्या मनातील भीती दूर झाली व ध्वज बांधणीचे ज्ञान सर्वांना मिळाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांच्या मते ध्वजबांधणी ही प्रत्येकाला आलीच पाहिजे, म्हणून दरवर्षी ध्वज बांधणीची फिरती जबाबदारी प्रत्येकाला मिळावी, असे मत व्यक्त केले. तर कार्यशाळेचे मार्गदर्शक विजयकुमार साळुंखे यांनी देशभक्तीची जाणीव जागृती करत ध्वज बांधणीतून आपली देशभक्ती प्रकट करावी आणि ध्वज बांधणीचे ज्ञान प्रत्येक नागरिकांनी घ्यावे, असे आवाहन केले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक एन.सी.सी. विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रशांत ढेपे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सोपान जाधव यांनी केले. डॉ एस.एस.पाडगावकर यांनी आभार मानले. या कार्यशाळे साठी मोठ्या संख्येने विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.